**ठळक बातम्या**

- जपानचा दौरा आटोपून प्रधानमंत्री चीनकरता रवाना/ भारत - जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू उपक्रमांमुळे दोन्ही देशातल्या भागीदारीला चालना मिळेल, असा व्यक्त केला विश्वास

- अमेरिकेतल्या फेडरल न्यायालयाने ट्रम्प यांनी आकारलेली टॅरिफ ठरवली बेकायदेशीर

- मुंबईत मराठा आरक्षण आंदोलनाचा दुसरा दिवस/ मराठा आरक्षण विषयक समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती शिंदे, जरांगे यांच्याशी चर्चा करणार

- जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा उपांत्य फेरीत प्रवेश

**आणि**

- बीड जिल्ह्यात पेंडगाव इथं रस्ता अपघातात सहा जणांचा मृत्यू

**<><><><>**

१५ व्या भारत - जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू केलेल्या भागीदारी उपक्रमामुळे दोन्ही देशातल्या व्यापार, तंत्रज्ञान, पर्यटन, कौशल्य, सुरक्षा आणि सांस्कृतिक भागीदारीला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते टोकयोमधे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. मोदी यांनी जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासह आज बुलेट ट्रेननं प्रवास केला. सेंदई इथल्या इलेक्ट्रॉन कारखान्याला त्यांनी भेट दिली.
यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीसाठी चीनला रवाना झाले. चीनमधे तीएनजिन इथं होणाऱ्या बैठकीत ते सहभागी होतील.

शांघाय सहकार्य संघटनेची २५ वी शिखर परिषद उद्यापासून चीनमधे तिएनजीन इथं सुरू होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत संघटनेच्या मागच्या २५ वर्षांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल तसंच पुढल्या दहा वर्षांसाठी धोरण आखलं जाईल. या परिषदेचं यजमानपद चीन पाचव्यांदा भूषवत असून चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग

परिषदेच्या अध्यक्षपदी असतील. या परिषदेला वीसहून अधिक देशांचे राष्ट्रप्रमुख तसंच दहा आंतरराष्ट्रीय संघटनांचे नेते उपस्थित राहणार आहेत.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या डिसेंबरमधे भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. रशियाचे परराष्ट्र व्यवहारमंत्री युरी उशकोव्ह यांनी मॉस्को इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुतीन चीनमधे शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीकरता जाणार असून तिथं ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर या दौऱ्याच्या तयारीकरता चर्चा करतील.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेली विविध प्रकारची आयात शुल्कं बेकायदेशीर असल्याचं सांगत फेडरल न्यायालयाने रद्दबातल ठरवली आहेत. आंतरराष्ट्रीय आपत्कालीन अधिकार कायदा या करांना मान्यता देत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. फेडरल न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी ट्रम्प प्रशासनाला १४ ऑक्टोबरपर्यंत वेळ दिली असून तोपर्यंत ही शुल्क लागू राहतील, अशी माहिती व्हाईट हाऊसचे प्रवक्ते कुश देसाई यांनी दिली.

<><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या अर्थव्यवस्थेत चांगल्या वाढीची नोंद झाल्यानं तज्ज्ञांनी समाधान व्यक्त केलं आहे.

पहिल्या तिमाहीत दर्शवलेल्या मजबूत आणि स्थिर वाढीला प्रभावी धोरण आणि देशांतर्गत बाजारपेठेतील वाढती मागणी कारणीभूत ठरत असल्याचं असोचेमचे अध्यक्ष संजय नायर यांनी म्हटलं आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत स्थिर वाढ दिसत असून विकसित भारत २०४७ च्या दिशेने आपण सातत्यपूर्ण वेगानं वाटचाल करत असल्याचं पी एच डी वाणिज्य आणि उद्योग संघटनेचे अध्यक्ष हेमंत जैन यांनी म्हटलं आहे.

देश जागतिक स्तरावर अनेक अडचणींचा सामना करत असताना अर्थव्यवस्थेचा विकास होत असल्याचं फिक्कीच्या महासंचालक ज्योती विज यांनी म्हटलं आहे.

भारताची अर्थव्यवस्था केवळ जगात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था नसून जीडीपीत झालेली वाढ उल्लेखनीय असल्याचं केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी म्हटलं आहे. तर, सुधारणा आणि लवचिकतेच्या बळावर जागतिक स्तरावर भारताच्या

अर्थव्यवस्थेनं वेग पकडला असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे.

याविषयी आर्थिक विश्लेषक उदय तारदाळकर म्हणाले.

- **- -होल्ड - बाईट - -**

- **<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गणेशोत्सवानिमित्त मुंबईच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी गणेशाचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर व्यापक चर्चा केली. त्यानंतर शहा यांनी लालबागच्या राजाचं कुटुंबियांसमवेत दर्शन घेतलं.

**<><><><>**

महामार्गावर प्रवास करताना टोल बूथवरून वेग कमी न करता किंवा न थांबता जाणं अधिक सोपं व्हावं यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मल्टी लेन फ्री फ्लो ही प्रणाली सुरू करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेबरोबर करार केला आहे. या प्रणालीची सुरुवात गुजरातमधल्या चोरयासी आणि हरयाणामध्ये घरौंदा इथल्या टोल बूथवरून होणार आहे. या प्रणालीमुळे फास्टॅगद्वारे टोलचे पैसे कापण्यासाठी वाहनांना थांबण्याची किंवा वेग कमी करण्याची गरज नसेल. त्यामुळे टोल नाक्यांवरच्या लांब रांगा टाळता येणार असून वाहतूक कोंडीही होणार नाही. यंदा देशभरातल्या २५ टोलनाक्यांवर ही योजना सुरू करण्याचा प्राधिकरणाचा विचार आहे.

**<><><><>**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले असून मराठा नेते मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणासंदर्भात काम करणाऱ्या समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्यासह दोन वरिष्ठ अधिकारी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा करतील, अशी माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज वार्ताहरांना दिली. हा प्रश्न सुटावा, हीच सरकारची भूमिका असल्याचं त्यांनी नमूद केलं. आंदोलनासाठी मुंबईत आलेल्या मराठा बांधवांच्या सोयीसाठी पाणी, दिवे, स्वच्छतेची सोय करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान आंदोलनकर्त्यांची संख्या अपेक्षेपेक्षा जास्त झाल्याने मुंबईत वाहतूक आणि व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. काल मुसळधार पाऊस झाल्यामुळे आझाद मैदानात चिखल आणि पाणी साचून, तसंच सोयी नसल्यामुळे आंदोलकांचे हाल झाले. त्यामुळे काहींनी मुंबई महानगरपालिकेच्या बाहेर ठिय्या आंदोलन केलं. यामुळे या परिसरात वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. परिसरातली काही उपहारगृहं आणि खाऊगल्ली सुरू करण्यात आली आहे. परिस्थिती लक्षात घेता या परिसरात सुरक्षा  तैनात करण्यात आली आहे. नवी मुंबईच्या सिडको प्रदर्शन केंद्रात उतरलेल्या कार्यकर्त्यांनी वीज आणि पाण्याची सोय नसल्याबद्दल आज रास्ता रोको आंदोलन केलं.

आंदोलनामुळे शीव–पनवेल हायवे, वाशी टोल नाका, ईस्टर्न फ्री वे यांसारख्या प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जीएसटी दरांत सुधारणांची घोषणा केल्यानंतर जीएसटी परिषदेच्या बैठकीआधी जीएसटी स्लॅबची संख्या कमी करावी अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. येत्या ३ आणि ४ सप्टेंबर रोजी जीएसटी परिषद होत आहे.

**<><><>**

दुग्धविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे आणि खासदार अशोक चव्हाण यांनी आज नांदेड शहर आणि जिल्ह्यातील पूर परिस्थितीची  पाहणी केली. नांदेड इथं नृसिंह विद्या मंदिरात स्थापन केलेल्या निवारा केंद्राची पाहणीही त्यांनी केली. निवारा केंद्रावरील सुविधा यापुढेही उपलब्ध रहाव्यात, यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

पॅरिस इथे सुरू असलेल्या बीडब्ल्युएफ जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी उपांत्य फेरी गाठ

ली आहे. त्यांनी काल रात्री झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या आरोन चिया आणि वुई यिक सोह या जोडीचा २१-१२, २१-१९ असा पराभव केला. या विजयामुळे भारताचं

कास्य पदक निश्चित झालं आहे. उपांत्य फेरीत या जोडीचा सामना चीनच्या ली यू आणि बो यांग चेन यांच्याशी होणार आहे.

**<><><><>**

बीड जिल्ह्यात धुळे-सोलापूर महामार्गावर पेंडगाव इथं आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. मृत व्यक्ती पेंडगावला दर्शनासाठी जात असताना भरधाव कंटेनरने त्यांना धडक दिल्यानं हा अपघात झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पोलिसांना दिल्याचं उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी वार्ताहरांना सांगितलं. तसंच मृतांच्या कुटुंबांना आवश्यक मदत दिली जाईल असं आश्वासनही पवार यांनी दिलं.

**<><><><>**

**अकोल्यात** गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टी मुळे अनेक घरांची पडझड झाली आहे. सोयाबीन, कापूस, तूर या खरीप पिकांसह इतर पिकांचं आणि जमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसंच जिल्ह्यातल्या विविध भागात नदी आणि नाल्यांना पूर आल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**नांदेडचे** पालकमंत्री अतुल सावे यांनी शहरातल्या आणि ग्रामीण भागातल्या पूरग्रस्त भागांना भेट देऊन पाहणी केली आणि नागरिकांशी संवाद साधला.

**बीडमध्येही** मागील दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे पूर्ण करुन सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

**//<><><><>//**